लोकमत

**संडे अँकर ।** देवानंद शिंदे; सेंट झेव्हिअर्सच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने पर्यावरण जागृती संमेलन

# परिपूर्ण माणूस घडविण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू

## दिवसभरात असे कार्यक्रम झाले

जीवनातील गुणवत्ता या विषयावर शासकीय कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कऱ्हाडच्या विसिटिंग फॅकल्टीच्या डॉ. मेधा कुमठेकर, 'शून्य ऊर्जा संकल्पना' यावर शिवाजी विद्यापीठाचे एम. टेक. विभागाचे माजी विभागप्रमुख नीलकंठ शिंदे, पर्यावरणातील गुणवत्ता यावर रिसर्च स्कॉलर आर्किटेक्ट अंजली जाधव यांची व्याख्याने झाली. जेसुइट पश्चिम झोनचे जॉन निलंकवली, कोनरॅड गोंजाल्वीस, बाबा प्रसाद लांका, अँथोनी डिसोझा, डॉ. विपुल त्रिवेदी, शपत शाह , फादर रॉबर्ट दास, प्रसाद गवस यांनी सुधा संमेलनामध्ये मार्गदर्शन केले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'अवघे विश्वच माझे घर' या उदात्त संकल्पनेतून जगाकडे बघण्याची दृष्टी आपल्या भारतीय संस्कृतीने दिली आहे. घर सुंदर बनविण्याची ही संकल्पना अतिशय समर्पक आहे. हाऊस आणि होम यांत फरक आहे. घर हा आनंदाचा स्रोत असतो. अखंड समाजव्यवस्था बनत असताना कुटुंब नावाची संकल्पना मजबूत व्हायला हवी. यातून परिपूर्ण असा माणूस घडविण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी केले.

हॉटेल पॅव्हेलियन येथे शनिवारी सेंट झेव्हिअर्स स्कूल माजी विद्यार्थी असोसिएशन, सेंट झेव्हिअर्स स्कूल व जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित 'पर्यावरण जागरूकता' या विषयावरील पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य फादर जेम्स थोरात होते.



**कोल्हापुरातील हॉटेल पॅव्हेलियन येथे शनिवारी सेंट झेव्हिअर्स स्कूल माजी विद्यार्थी असोसिएशन, सेंट झेव्हिअर्स स्कूल व जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाच्या माजी विद्यार्थ्यांच्या पश्चिम विभागीय संमेलनाचे उद्घाटन डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. यावेळी फादर जेम्स थोरात, 'झेसाकोप'चे निमंत्रक प्रवीण सोळंकी, माजी विद्यार्थी संघटनेचे वेस्ट झोनचे अध्यक्ष फ्रान्सिस्को डिकॉस्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल, बाबा प्रसाद, प्रिया बासराणी उपस्थित होते.**

उद्घाटनप्रसंगी 'झेसाकोप'चे निमंत्रक प्रवीण सोळंकी,'जेसुइट' माजी विद्यार्थी संघटनेचे वेस्ट झोनचे अध्यक्ष फ्रान्सिस्को डिकॉस्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल यांची उपस्थिती होती.

यावेळी कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, जगण्यासाठी घर अधिक सुंदर करण्याची या संमेलनाची संकल्पना अत्यंत कौतुकास्पद आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी आधी घर समृद्ध करण्याची गरज आहे. सद्य:स्थितीत पर्यावरणाच्या अनेक समस्या जगासमोर आहेत. त्या सोडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. प्रत्येक संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी अशा जाणिवा जोपासल्या तर समाजाचे अनेक प्रश्न सुटू शकतात.

प्राचार्य थोरात म्हणाले, संमेलनात जेसुइट सोसायटीचे पश्चिम विभागातील मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. 'पर्यावरण जागरूकता' हा संमेलनाचा मुख्य विषय आहे. सध्या पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न उद्‌भवला आहे. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा जागर होत आहे.

फर्नांडिस डिकोस्टा यांनी प्रास्ताविक केले, तर प्रिया बासराणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण सोळंकी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी झेसाकोप माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य आर्किटेक्ट सूरज जाधव, उद्योजक राजू लिंग्रस, जितेंद्र बामणे, संतोष लोबो, दीपक पाटील, फ्रँक मंतेरो, रुजाय गोन्साल्विस, आदींनी परिश्रम घेतले.

# पर्यावरणासाठी घर समृद्ध करा

## सेंट झेवियर्सच्या संमेलनात कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'माणूस घडविण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होते. जगण्यासाठी घर अधिक सुंदर करण्याची या संमेलनाची संकल्पना अत्यंत कौतुकास्पद आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी आधी घर समृद्ध करण्याची गरज आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. सेंट झेवियर्स माजी विद्यार्थी असोसिएशन, सेंट झेवियर्स स्कूल व जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित 'जाय' पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते हॉटेल पॅव्हेलियन येथे शनिवारी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य फादर जेम्स थोरात होते.

अमित गद्रे




**'जाय' संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार करताना सेंट झेवियर्सचे मुख्याध्यापक फादर जेम्स थोरात. शेजारी झेसाकोपचे निमंत्रक प्रवीण सोळंकी, जेसुइट माजी विद्यार्थी संघटनेचे वेस्ट झोनचे अध्यक्ष फ्रान्सिस्को डिकॉस्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल, बाबाप्रसाद लांका व प्रिया बासराणी.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''अवघे विश्वचि माझे घर' या उदात्त संकल्पनेतून जगाकडे बघण्याची दृष्टी आपल्याला संस्कृतीने दिली आहे. घर सुंदर आणि परिपूर्ण बनविण्याची ही संकल्पना अतिशय समर्पक आहे. 'हाउस' आणि 'होम' यात फरक आहे. घर नेहमीच आपले वाटते. परिपूर्ण असा माणूस घडविण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होते. आपल्या घराविषयी बोलताना माणूस हृदयापासून व्यक्त होतो. आजच्या घडीला घर ही संकल्पना अधिक व्यापक आणि सशक्त करण्याची गरज आहे. चांगल्या समाजाचे प्रतिबिंब कुटुंबातून उमटत असते. घरातील वातावरणाचा माणसाच्या जडणघडणीवर दूरगामी परिणाम होतो.'

ते पुढे म्हणाले, 'सद्यःस्थितीत पर्यावरणाच्या अनेक समस्या जगासमोर आहेत. त्या सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचा हातभार महत्त्वाचा आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणासाठी काम व्हावे. अनेक विचारवंतांनी घराविषयीची संकल्पना सांगितली आहे. घर हा आनंदाचा स्रोत असतो. अखंड समाजव्यवस्था उभा राहताना कुटुंब मजबूत व्हायला हवे. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरणबाबत अनेक विषयांना स्पर्श केला जात आहे.'

प्राचार्य थोरात म्हणाले, 'संमेलनात जेसुइट सोसायटीचे पश्चिम विभागातील मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. 'पर्यावरण जागरूकता' हा संमेलनाचा मुख्य विषय आहे. सध्या पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न उद्भवला आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी एकत्रितरीत्या विधायक उपक्रमांची गरज आहे. संस्थेचे देशभरात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी आपापल्यापरीने वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमात योगदान देतात. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा जागर होत आहे.'

'जीवनातील गुणवत्ता' विषयावर बोलताना डॉ. मेधा कुमठेकर म्हणाल्या, 'रस्त्यावरच्या पालापाचोळ्याचा वापर नैसर्गिक खत म्हणून करावा. घरातील ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करून त्यापासून घरच्या घरी खतनिर्मिती करता येते. कोणत्याही कामाची स्वतःपासून सुरुवात करा. त्यामुळे पर्यावरण वाचवण्यासाठी हातभार लावता येईल.'

'शून्य ऊर्जा संकल्पना' या विषयावर बोलताना नीलकंठ शिंदे म्हणाले, 'सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्याकडे लोकांनी लक्ष द्यावे. कोळशाचे साठे दिवसेंदिवस कमी होत आहेत. तसेच कार्बन उत्सर्जन वाढत आहे. त्यामुळे सौरऊर्जा वापरण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहणार नाही.'

'पर्यावरणातील गुणवत्ता' विषयावर बोलताना आर्किटेक्ट अंजली जाधव म्हणाल्या, 'घरात एसी व पंख्याचा वापर कमी करावा. घरातील वातावरण शुद्ध ठेवण्यासाठी कमीत कमी पाणी लागणारी झाडे लावावीत. कृत्रिम साधनांचा वापर कमी केल्यास प्रदूषणाला आळा घालता येईल.'

फर्नांडिस डिकोस्टा यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण सोळंकी यांनी मनोगत व्यक्त केले. दत्तप्रसन्न सिम्बल, जितेंद्र बामणे, सूरज जाधव, राजू लिंग्रस, संतोष लोबो, दीपक पाटील, फ्रँक मंतेरो उपस्थित होते. प्रिया बासराणी यांनी सूत्रसंचालन केले.




**कोल्हापूर : पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. फ्रान्सिसको डिकॉस्टा, दत्तप्रसन्न सिंबल, फादर जेम्स थोरात, प्रवीण सोळंकी. (छाया : पप्पू अत्तार)**

# घराच्या सुख, समृद्धीसाठी प्रयत्न गरजेचे : डॉ. शिंदे

## 'सेंट झेवियर्स'चे पश्चिम विभागीय संमेलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'हे विश्वची माझे घर' या उक्तीप्रमाणे घरात बदल, घरातील व्यक्तींचे मन बदलासाठी सांगड घालणे महत्त्वाचे आहे. घरात सुख, समृद्धी आणि शांती राहील, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

सेंट झेवियर्स माजी विद्यार्थी असोसिएशन व सेंट झेवियर्स स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने जेसुईट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाचे माजी विद्यार्थ्यांचे पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जेसुएटचे पश्चिम झोनचे जॉन निलंकवली, कोनरॅड गोजांलवीस, बाबा प्रसाद लंका, अँथोनी डिसोझा, डॉ. विपुल त्रिवेदी, शपत शाह, फादर रॉबर्ट दास, प्रसाद गवस यांनी मनोगते व्यक्त केली. संमेलनात जेसुईट सोसायटीच्या पश्चिम विभागातील मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. झेसाकॉपचे निमंत्रक प्रवीण सोळंकी यांनी स्वागत केले. प्रिया बासराणी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सेंट झेवियर्सचे प्राचार्य फादर जेम्स थोरात, जेसुईट माजी विद्यार्थी संघटनेचे पश्चिम विभागाचे अध्यक्ष फ्रान्सिसको डिकॉस्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल, सूरज जाधव, उद्योजक राजू लिंग्रस आदी उपस्थित होते.

# पर्यावरण वाचवण्याची सुरुवात घरातूनच व्हावी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माणूस घडवण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होते. त्यामुळे पर्यावरण वाचवण्यासाठी आधी घरातूनच सुरुवात व्हायला हवी, त्यामुळे प्रथम घर समृद्ध करण्याची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. ते सेंट झेवियर्स माजी विद्यार्थी असोसिएशन, सेंट झेवियर्स स्कूल व जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित 'जाय' पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य फादर जेम्स थोरात होते.

डॉ. शिंदे म्हणाले, परिपूर्ण असा माणूस घडवण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होते. अवघे विश्वचि माझे घर या उदात्त संकल्पनेतून जगाकडे बघण्याची दृष्टी आपल्या संस्कृतीने दिलेली आहे. घर सुंदर बनवण्याची ही संकल्पना अतिशय समर्पक आहे. हाऊस आणि होम यात फरक आहे, घर नेहमी आपले वाटते. सध्या घर ही संकल्पना अधिक व्यापक करण्याची गरज निर्माण झाली आहे.





**कोल्हापूर : 'जाय' पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व मान्यवर. (छाया : एस. अली)**

सद्यःस्थितीत पर्यावरणाच्या अनेक समस्या जगासमोर आ वासून उभ्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अनेक विविध उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने पर्यावरण संरक्षणासाठी काम होणे गरजेचे आहे.

विचारवंतांनी आपापल्या पद्धतीने घराविषयीची संकल्पना सांगितली आहे. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरणविषयक अनेक विषयांना स्पर्श केला जात आहे. आपला समृद्ध करण्याचा होत असलेला प्रयत्न नक्कीच अभिमानास्पद आहे. प्रत्येक संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी अशा जाणिवा जोपासल्या तर समाजाचे अनेक प्रश्न सुटू शकतात. जगणं सुंदर करण्याचा या संमेलनाच्या माध्यमातून होत असलेला प्रयत्न निश्चितच फायदेशीर ठरेल, अशी आशा आहे.

प्राचार्य फादर जेम्स थोरात म्हणाले, संमेलनात जेसुइट सोसायटीचे पश्चिम विभागातील मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. 'पर्यावरण जागरुकता' हा संमेलनाचा मुख्य विषय आहे. सध्या पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न आ वासून उभा आहे. जगभरातील या समस्यांवर सर्वांनी मिळून मात करणे गरजेचे आहे. देशभरात विखुरलेले माजी विद्यार्थी आपापल्या परीने वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमात योगदान देत आहेत. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीचा जागर होत आहे, ही बाब महत्त्वाची आणि अभिमानास्पद आहे. फर्नांडिस डिकोस्टा यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण सोळंकी यांनी मनोगत व्यक्त केले.

सकाळ

# पर्यावरणासाठी आधी घर समृद्ध करा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : सेंट झेवियर्सच्या माजी विद्यार्थ्यांचे संमेलन

**कोल्हापूर, ता. ११ : 'माणूस घडवण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होत असते. जगण्यासाठी घर अधिक सुंदर करण्याची या संमेलनाची संकल्पना कौतुकास्पद आहे, पर्यावरण वाचवण्यासाठी आधी घर समृद्ध करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. सेंट झेवियर्स माजी विद्यार्थी असोसिएशन, सेंट झेवियर्स स्कूल व जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाच्या माजी विद्यार्थ्यांतर्फे झालेल्या 'जाय' पश्चिम विभागीय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य फादर जेम्स थोरात अध्यक्षस्थानी होते.**

डॉ. शिंदे म्हणाले, अवघे विश्वचि माझे घर या उदात्त संकल्पनेतून जगाकडे बघण्याची दृष्टी आपल्या संस्कृतीने दिली आहे. हाऊस आणि होम यात फरक आहे. घर नेहमीच आपले वाटते. परिपूर्ण असा माणूस घडवण्याची प्रक्रिया घरातूनच सुरू होत असते. घराविषयी बोलताना माणूस हृदयापासून व्यक्त होतो. आजच्या घडीला घर ही संकल्पना अधिक व्यापक करण्याची गरज आहे. अनेक विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणासाठी काम होणे गरजेचे आहे. या संमेलनाच्या माध्यमातून पर्यावरण विषयक अनेक विषयांना स्पर्श केला जात आहे. आपल्या समृद्ध करण्याचा होत असलेला प्रयत्न अभिमानास्पद आहे.

प्राचार्य थोरात म्हणाले, 'संमेलनात जेसुइट सोसायटीचे पश्चिम विभागातील मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. 'पर्यावरण जागरूकता' हा संमेलनाचा मुख्य विषय आहे सध्या पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न उद्भवला आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी एकत्रित विधायक उपक्रमांची गरज आहे.

संमेलनात दिवसभरात जीवनातील गुणवत्ता या विषयावर शासकीय



कोल्हापूर : सेंट झेवियर्सच्या माजी विद्यार्थी संमेलनात विविध मान्यवरांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी मुख्याध्यापक फादर जेमस थोरात, 'झेसाकोप'चे निमंत्रक प्रवीण सोळंकी, फ्रान्सिस्को डिकॉस्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल, बावाप्रसाद लांका, प्रिया बासराणी.

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराडच्या व्हिजिटिंग फॅकल्टी डॉ. मेधा कुमठेकर यांचे व्यख्यान, शून्य ऊर्जा संकल्पना या विषयावर शिवाजी विद्यापीठाचे एम. टेक विभागाचे माझी विभाग प्रमुख. नीलकंठ शिंदे यांचे व्याख्यान, पर्यावरणातील गुणवत्ता या विषयावर रिसर्च स्कॉलर आर्किटेक्ट् अंजली जाधव यांची व्याख्याने झाली. तसेच जेसुइट पश्चिम झोनचे जॉन निलंकवली, कोनरॅड गोजांलवीस, बाबा प्रसाद लांका, अँथोनी डिसोझा, डॉ. विपुल त्रिवेदी, शपत शाह, फादर रॉबर्ट दास, प्रसाद गवस यांनी संमेलनात विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

सूरज जाधव, उद्योजक राजू लिंग्रस, जितेंद्र बामणे, संतोष लोबो, दीपक पाटील, फ्रँक मंतेरो, रुजाय गोंसल्वी आदींनी परिश्रम घेतले. प्रिया बासरणी यांनी सूत्रसंचालन केले.

12 MAY 2019
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमी अपेक्षांमुळेच घराला घरपण मिळते

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : जेसुइट सेंट झेवीयर्सच्या माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनामध्ये ते बोलत होते

प्रतिनिधी
कोल्हापूर

कमीत कमी अपेक्षा बरोबर जास्तीत जास्त मने जोडल्यामुळे, घरातील वातावरण आपण पूर्णपणे चांगले ठेऊ शकतो. यामुळे घरातील सुख, समृध्दी व शांतीचा वावर होऊन घराला घरपण राहू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

सेंट झेवीयर्स माजी विद्यार्थी असोसिएशन व सेंट झेवीयर्स स्कूल, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने, जेसुइट माजी विद्यार्थी असोसिएशन ऑफ इंडियाचे, माजी विद्यार्थ्यांचे पश्चिम विभागीय संमेलनामध्ये ते बोलत होते. हॉटेल पॅव्हेलियन येथे शनिवारी हे संमेलन पार पडले. याचे उद्घाटन जेसुइट संस्थेचे पुणे प्रांतचे प्रॉव्हीशीयल रेव्ह. फादर ॲन्ड्रीव्ह फर्नांडीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले. 'पर्यावरण जागरूकता' संमेलनाचा मुख्य विषय असून, 'चला आपलं घर सुखी आणि समृद्ध करूया' हा त्यांच्या भाषणाचा विषय आहे. या संमेलनास मुंबई, गोवा, गुजरात, पुणे येथील ४१ संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



कोल्हापूर : जेसुइट संमेलनामध्ये बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत फादर जेम्स थोरात, प्रविण सोळंकी, फ्रान्सिको डिकास्टा, दत प्रसन्न सिंबल, बावा प्रसाद लांका, प्रिया बासराणी आदी.

कुलगुरू म्हणाले, घरातील लोकांच्या मनातील ज्या भावना असतात, त्यावरच घरातील वातावरण अवलंबून असते. कमीत-कमी अपेक्षाबरोबर जास्तीत जास्त मने जोडल्याने घरातील वातावरण पूर्णपणे चांगले ठेऊ शकतो.

'हे विश्वची माझे घर' या पंक्तीचा उल्लेख करून, घरातील लोकांबद्दल व व्यक्तींच्या मनाबदल कशी सांगड घालता येईल याविषयी त्यांनी सांगीतले.

संमेलनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सेंट झेवीयर्सचे मुख्याध्यापक फादर जेम्स थोरात, झेसाकोपचे निमंत्रक प्रविण सोळंकी, जेसुइट माजी विद्यार्थी संघटनेचे वेस्ट झोनचे अध्यक्ष फ्रान्सिको डिकास्टा, जनरल सेक्रेटरी दत्तप्रसन्न सिंबल यांच्या उपस्थितीत झाले.

या एकदिवशीय संमेलनामध्ये 'जीवनातील गुणवत्ता' या विषयावर गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनियरींग कराडच्या डॉ. मेघा कुमठेकर, 'शुन्य उर्जा संकल्पना' या विषयावर प्रो. निळकंठ शिंदे, 'पर्यावरणातील गुणवत्ता' यावर आर्किटेक्ट अंजली जाधव तसेच जॉन निलकवली व कोनरेड गोंजाववीस, बावा प्रसाद लांका, ॲंथोनी डिसोझा, डॉ. विपुल त्रिवेदी, शपत शाह, फादर रॉबर्ट दास, प्रसाद गवस यांचे विविध विषयावर व्याख्यान झाले.

या संमेलनासाठी झेसाकोपचे माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य आर्कि. सूरज जाधव, उद्योजक राजू लिग्रस, जितेंद्र बामणे, संतोष लोबो, दिपक पाटील, फ्रँक मतेरो, संजय गोसाव्वी आदींनी परिश्रम घेतले.